दिनांक  27/09/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 76

विषय – नगरपरिषद आस्थापनेवरील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना तात्पुरते निवृत्ती वेतन सुरु करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ-  1)मा.मुख्याधिकारी यांनी आस्थापना विभाग यांची दिनांक 27/09/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

2) मा.आयुक्त तथा संचालक,नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचे कडील स्थायी निदेश 11_2023,दि.15/12/2023.

3) महाराष्ट्र नागरी सेवा नियम (निवृत्तीवेतन),1982 मधील नियम 126.

4) सेवानिवृत्त कर्मचारी यांचा तात्पुरते निवृत्तीवेतन सुरु करणेबाबतचा विनंती अर्ज आवक क्र.3849,दि.23/09/2024.

विटा नगरपरिषदेच्या आस्थापनेवरील खालील ( परिशिष्ट अ ) मध्ये नमूद केलेनुसार 8 कर्मचारी हे नियत वयोमानानुसार दि.31/05/2024 रोजी सेवानिवृत्त झाले आहेत.

( परिशिष्ट अ )

| अ.क्र. | कर्मचा-यांचे नाव | पदनाम | सेवानिवृत्ती दिनांक |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | श्री.राजेंद्र गौरीहर चिरमे | शिफ्ट इंजिनिअर | 31/05/2024 |
| 2 | श्री.सुनिल मारुती कुंभार | वरिष्ठ लिपिक | 31/05/2024 |
| 3 | श्री.अरुण बंडू वारे | सफाई कामगार | 31/05/2024 |
| 4 | श्री.अनिल शामराव कांबळे | सफाई कामगार | 31/05/2024 |
| 5 | श्री.भगवान पांडुरंग पवार | कुली | 31/05/2024 |
| 6 | श्री.बाबासाहेब व्यंकाप्पा मल्याळकर | सफाई कामगार | 31/05/2024 |
| 7 | श्री.चंदर शिवाजी कोळेकर | सफाई कामगार | 31/05/2024 |
| ८ | श्री.नामदेव रामण्णा कांबळे | नाका मदतनीस | 31/05/2024 |

संदर्भ क्र.1 मधील स्थायी निदेश नुसार नगरपरिषद / नगरपंचायती मधील स्थानिक कर्मचारी यांच्या सेवा विषयक बाबी व वेतन निश्चीतीची पडताळणी कार्यपध्दती निश्चित केली आहे. सदर स्थायी निदेशात नगरपरिषदा/नगरपंचायती येथे कार्यरत राज्य शासकीय अधिकारी व राज्य संवर्गातील कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त नगरपरिषद आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांच्या वेतन निश्चितीच्या पडताळणीकरिता मा.विभागीय सह आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालयांतर्गत मंजूर

पान नं.2 वर

पदावर कार्यरत असणारे लेखापाल/लेखापरीक्षक, श्रेणी-अ / सहाय्यक आयुक्त (लेखा), लेखाविभागातील अधिकारी हे **“सक्षम वेतन पडताळणी यंत्रणा”** म्हणून वेतन पडताळणीचे काम करतील असे नमूद आहे.

तसेच सदरचा स्थायी निदेश हा दि.1 एप्रिल, 2024 रोजी अथवा त्यानंतर सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी लागू राहील असे नमूद आहे. त्यामुळे विटा नगरपरिषद आस्थापनेवरील (परिशिष्ट अ) मधील सर्व कर्मचारी हे दि.31/05/2024 रोजी सेवानिवृत्त झालेने त्यांना निवृत्ती विषयक लाभ लागु करणेकरीता त्यांचे मुळ सेवा पुस्तक पडताळणी करणेकामी माविभागीय आयुक्त. कार्यालय. नगरपरिषद प्रशासन शाखाविभाग, पुणे यांचेकडे पाठविणे आवश्यक होते.

मा.विभागीय आयुक्त कार्यालयाकडून संबधित कर्मचारी यांची सेवा पुस्तके ही त्यांचेकडे सादर करणेपूर्वी प्राथमिक तपासणी करणेकामी प्रत्येक जिल्ह्यातून 2 संवर्ग अधिकारी यांची नेमणूक केलेली आहे. त्यांचेकडून सेवा पुस्तकांची प्राथमिक तपासणी करून घेतल्यानंतरच सदर सेवा पुस्तके मा.विभागीय आयुक्त कार्यालयाकडे सादर करणेबाबत निर्देश प्राप्त झाले आहेत.

सदर सर्व प्रक्रिया पूर्ण होण्यास विलंब लागणार असल्याने संदर्भ क्र.3 नुसार (परिशिष्ट अ) मधील सर्व निवृत्त कर्मचाऱ्यांनी निवृत्तीवेतन मिळण्यास विलंब होत असल्याने त्यांचे कुटुंबाचे उदरनिर्वाह करिता त्यांना तात्पुरते निवृत्तीवेतन मिळणेकामी अर्ज सादर केला आहे.

संदर्भ क्र.2 मधील महाराष्ट्र नागरी सेवा नियम (निवृत्तीवेतन),1982 मधील नियम 126 (3) मध्ये कार्यालय प्रमुखाने सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना तात्पुरते निवृत्तीवेतन लागू करणेबाबत तरतूद आहे. त्यानुसार खालील परिशिष्ट ब मध्ये नमूद कर्मचाऱ्यांना त्यांना अनुज्ञेय निवृत्तीवेतनाच्या 75 % तात्पुरते निवृत्ती वेतन सुरु करणेबाबतचा तपशील नमूद केला आहे.

( परिशिष्ट ब )

| अ. क्र. | कर्मचा-यांचे नाव | सेवानिवृत्ती दिनांक | शेवटचे मूळ वेतन | अनुज्ञेय निवृत्ती वेतन | अनुज्ञेय वेतनाच्या निवृत्ती वेतनाच्या 75 % तात्पुरत्या निवृत्ती वेतनाची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | श्री.राजेंद्र गौरीहर चिरमे | 31/05/2024 | 66000 | 33000 | 24750 |
| 2 | श्री.सुनिल मारुती कुंभार | 31/05/2024 | 41000 | 20500 | 15375 |
| 3 | श्री.अरुण बंडू वारे | 31/05/2024 | 31700 | 15850 | 11888 |
| 4 | श्री.अनिल शामराव कांबळे | 31/05/2024 | 34700 | 17350 | 13013 |
| 5 | श्री.भगवान पांडुरंग पवार | 31/05/2024 | 34700 | 17350 | 13013 |
| 6 | श्री.बाबासाहेब व्यंकाप्पा मल्याळकर | 31/05/2024 | 31700 | 15850 | 11888 |
| 7 | श्री.चंदर शिवाजी कोळेकर | 31/05/2024 | 31700 | 15850 | 11888 |

पान नं.3 वर

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 8 | श्री.नामदेव रामण्णा कांबळे | 31/05/2024 | 31700 | 15850 | 11888 |

तरी उपरोक्त (परिशिष्ट ब) मधील कर्मचाऱ्याना महाराष्ट्र नागरी सेवा नियम (निवृत्तीवेतन),1982 मधील नियम 126(3) नुसार त्यांना अनुज्ञेय निवृत्तीवेतनाच्या 75 % तात्पुरते निवृत्ती वेतन सुरु करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 27/09/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 77

विषय – विटा नगरपरिषद आरोग्य विभागासाठी विविध मशीनरी दुरूस्त करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी स्वच्छता निरीक्षक यांची दिनांक 25/09/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगपरिषद आरोग्य विभागासाठी रोड स्वीपर मशीन,नाला डी शेल्डींग मशीनरी सध्या बंद स्वरूपात आहेत.तसेच फॉगिंग मशीन,कटर मशीन,एच.टी.पी.मशीन वारंवार नादुरूस्त होत असते.त्यामुळे सदर मशीनची दुरूस्ती करणे आवश्यक आहे.त्यामुळे सदर मशीनरी दुरूस्ती केलेस कामे करणे सुलम होईल.

तरी विटा नगरपरिषद आरोग्य विभागाकडील विविध मशीनरी दुरूस्ती करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा